# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरकाव्य
- कवी / कवयित्रीचे नाव :-  सौ. भारती साखरदांडे

---

षड्ज, ऋषभ, गंधार, मध्यम
पंचम, धैवत, निषाद
संक्षिप्त नामे सजले सप्तक
सा रे ग म प ध नी

अचल स्वर षड्ज, पंचम
शुद्ध, तीव्र, मध्यम स्वर
शुद्ध, कोमल ऋषभ, गंधार
आणिक धैवत, निषाद

स्वरमंडलातील विश्व् ऐसे
जिथे नादब्रह्म वसे
सप्तसुरांचे वलय अनोखे
स्वर संगमातूनी उठूनी दिसे

घडविता शब्दालंकार
शुद्ध, कोमल, तीव्र स्वरांतून
द्रुत, मध्य लयीत रागरंग
खुलविती मधुर सूरसंगम

मणी ओविता सप्तसुरांचे
मध्य, मंद्र, तार सप्तकाचे
ताल सुरांची साथ सुसंगत
डोलविती मन परमानंदात

सप्तसुर सजले धजले
नियमात बैसवूनि रागरंग फुलले
स्पर्शिली किमया कण स्पंदांतूनी
कोमल, तीव्र, शुद्ध स्वरमालेची

Anahat Music Therapy

# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

तालसुरांचे अगणित समीकरण
छटा अनाहत कलाकलांतून
ऊर्जास्रोत सकारात्मतेचा
उजळती भावना मनोमनींच्या

साधना करीता सप्तसुरांची
चैतन्याचा अखंड निर्झर
जागृत करिती केंद्रे अमाप
जीवनशैली करुनि प्रफुल्लित

Anahat Music Therapy